# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB, Legrand, HAVELLS, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २६२ वा शनिवार दि.२३ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## शरद पवार गटाच्या संभाव्य ९ उमेदवारांची यादी जाहीर



मुंबई : काँग्रेसने गुरुवारी सात उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर शरद पवार गटाची एक संभाव्य यादी पुढे येत आहे. या यादीमध्ये बारामती लोकसभा मतदारसंघासह बीड, माढा, शिरुर, दिंडोरी, वर्धा या जागांचे उमेदवार ठरल्याचे सांगितले जात आहे.शरद पवार गटाची ९ जणांची पहिली यादी जाहीर होऊ शकते. यामध्ये बारामती, माढा, रावेर, सातारा, शिरुर, नगर दक्षिण, दिंडोरी, बीड, वर्धा या समदारसंघांचा समावेश आहे. हे मतदारसंघ शरद पवार गटाकडे जावू शकतात.बारामती- सुप्रिया सुळे, माढा- महादेव जानकर (रासप), सातारा- बाळासाहेब पाटील किंवा श्रीनिवास पाटील, शिरुर- अमोल कोल्हे, नगर दक्षिण- निलेश लंके, बीड- बजरंग सोनवणे किंवा ज्योती मेटे, वर्धा- अमर काळे.दरम्यान, बीडच्या जागेवरुन राज्यामध्ये उलटसुलट चर्चा सुरु आहे. बजरंग सोनवणे यांनी शरद पवार गटामध्ये प्रवेश केल्यानंतर तेच लोकसभेचे उमेदवार असतील, असे सांगितले जात आहे. तसे झाले तर पंकजा मुंडे यांना विजय अत्यंत सोपा होऊन जाईल. परंतु ज्योती मेटे यांना शरद पवारांनी उमेदवारी दिली तर मराठा मते मेटेंना मिळवता येतील. पर्यायाने पंकजांना निवडणूक म्हणावी तेवढी सोपी ठरणार नाही.पुण्याच्या जागेविषयी राज्यात उत्सुकता आहे. भाजपने मुरलीधर मोहोळ यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर काँग्रेसने रवींद्र धंगेकर यांना मैदानात उतरवले आहे. त्यातच नुकतेच मनसेतून बाहेर पडलेले वसंत मोरे यांनी अपक्ष निवडणुकीची घोषणा केली. त्यामुळे यावेळची पुणे लोकसभेची चुरस रंगतदार होणार, यात शंकाच नाही.

## उदयनराजे भोसले-अमित शाह भेट लांबणीवर, शनिवारी भेटीची शक्यता




नवी दिल्ली, : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने दुसऱ्या यादीत राज्यातील २० उमेदवारांची यादी जाहीर केली. मात्र यात सातारा लोकसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर राज्यात अनेक चर्चांना पेव फुटले असताना खासदार उदयनराजे भोसले दिल्ली दौऱ्यावर आहेत. ते आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार होते मात्र त्यांची भेट आज होऊ शकली नाही, कदाचित उद्या शनिवारी भेट होण्याची शक्यता आहे.'अबकी बार, ४०० पार' हे मिशन पूर्ण करण्यासाठी भाजप आणि मित्र पक्षांच्या वतीने लोकसभेच्या एकेक जागेवर विचार करून उमेदवार दिले जात आहेत. महाराष्ट्रातील ४८ पैकी किती लोकसभा मतदारसंघ भाजप महायुतीतून लढणार याची आकडेवारी अद्याप स्पष्ट नाही. मात्र भाजपने त्यापूर्वीच २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. दरम्यान, सातारा लोकसभेसाठी खासदार उदयनराजे भोसले यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली नाही. या पार्श्वभूमीवर उदयनराजे समर्थकांनी संताप व्यक्त केला होता. त्यानंतर उदयनराजे भोसले काल, गुरुवारपासून दिल्लीत तळ ठोकून आहेत. साताऱ्यातील लोकसभा उमेदवारी संदर्भात उदयनराजे भोसले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत. दोन्ही नेत्यांमधील ही भेट आज शुक्रवारी होणार होती मात्र आता ही भेट शनिवारी होणार असल्याचे समजते. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमधील अंतर्गत धुसफूस चालली आहे का? अशाही चर्चा राजकीय वर्तुळात जोरदार सुरू आहेत.

## चहल मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त सचिवपदी नियुक्ती



मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त पदावरुन बदलीनंतर इक्बालसिंह चहल यांची आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अतिरिक्त सचिव पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार तीन वर्षांपेक्षा एका पदावर, जिल्ह्यात किंवा मूळ गाव असलेल्या जिल्ह्यात कार्यरत असलेल्या निवडणुकीच्या कामाशी संबंधित अधिका-यांच्या बदल्या करण्याचे सर्वसाधारण आदेश आयोगाने दिले होते. या आदेशानुसार इक्बालसिंह चहल, अश्विनी भिडे आणि पी.वेलारासू यांची बदली करणे बंधनकारक झाले.मुंबई मनपाच्या आयुक्तपदी नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त आयुक्तपदी काम केलेल्या भूषण गगराणी यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर आज इक्बालसिंह चहल यांची मुख्यमंत्री शिंदे यांच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. इक्बालसिंह चहल यांनी मुंबईच्या आयुक्तपदी काम करताना राजकीय स्थित्यंतरे अनुभवली आहेत. तसेच दोन्ही वेळच्या सत्ताधा-यांशी जुळवून घेणारे अधिकारी म्हणूनही ते ओळखले गेले. आता चहल यांच्याकडे मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त सचिव पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## भाजप उमेदवारांची चौथी यादी जाहीर

लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने गुरुवारी (दि. २१) नऊ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि. २२) भाजपने चौथी यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये तामिळनाडूतील आणि पुद्दुचेरीतील एका उमेदवाराचा समावेश आहे. तिसऱ्या आणि चौथ्या दोन्ही यादीत भाजपने प्रामुख्याने



दक्षिण भारतातील जागांवरील उमेदवारांची घोषणा केली आहे.सात टप्प्यात होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये पहिल्या टप्प्यात म्हणजेच १९ एप्रिलला मतदान होणार आहे. पुद्दुचेरी लोकसभा जागेवर भाजपने ए. नमशिवयम यांना उमेदवारी दिली आहे. ही जागा सध्या काँग्रेसकडे आहे.भाजपच्या तिसऱ्या यादीत तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष के अन्नामलाई यांना कोईम्बतूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. तर तेलंगाणाच्या राज्यपालपदाचा राजिनामा देणाऱ्या तमिलिसाई सुंदरराजन यांना चेन्नई दक्षिणमधून उमेदवारी दिली. त्यांच्याकडे पुद्दूचेरीच्या नायब राज्यपालपदाचीही जबाबदारी होती.

## मला तडीपार करायचा गृहमंत्र्यांचा डाव




जालना : मला रात्री माहिती मिळाली की, माझ्याविरोधात आणखी १० ते १५ केसेस करायच्या आणि मला तडीपार करण्याच्या ऑर्डर काढायच्या. गृहमंत्रीसाहेब स्वप्न बघायचे कमी करा. तडीपार करण्याचा प्रयत्न करायचा, क्लिप व्हायरल करायची. मराठा समाज विरोधात गेला आणि आता इतर समाजही विरोधात चालला आहे या शब्दांत मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा एल्गार केला.मीडियाशी बोलताना मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघाती टीका केली. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही सूचक संकेत दिले. गृहमंत्र्यांच्या एक गोष्ट लक्षात येत नाही की, ती म्हणजे तुम्ही जेवढे माझ्या विरोधात जाल, तेवढी लोक माझ्या बाजूने उभी राहतील. मला पाठिंबा देतील. एका बाजूला म्हणायचे की, गुन्हे मागे घेतो आणि दुस-या बाजूला पुन्हा गुन्हे दाखल करायचे. परळीसारख्या ठिकाणी ९० हजार ते एक लाख लोक सभेला होते. यावरून त्यांच्या लक्षात आले पाहिजे. हा तुमच्यासाठी खूप मोठा संकेत आहे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांनी शहाणपणाची भूमिका घ्यायला हवी. गृहमंत्र्यांना एवढा द्वेष असणे कामाचे नाही, अशी टीका मनोज जरांगे यांनी केली.तर राजकीय सुपडा साफ होणार गृहमंत्री स्वत:ला सर्वोच्च न्यायालयाच्या वर समजत असतील. ही सत्ता मराठ्यांनी दिली असली तरी मराठ्यांवरच अन्याय करू शकतो, असे त्यांना वाटत असेल. या सत्तेचा वापर करून मराठ्यांना चिरडण्याचा प्रयत्न ते करत आहेत. देशभरात मोठ्या जातींना पायाखाली चिरडण्याचा प्रयत्न यांनी केला आहे. पण जर सर्व मोठ्या जाती एकत्र आल्या तर यांचा राजकीय सुपडा साफ होईल असा स्पष्ट इशारा मनोज जरांगे यांनी दिला. अनेक विषयांना हात घालणार २४ तारखेला निर्णायक भूमिका घेणार असून १५ ते १६ विषय आहेत. गेल्या ७० वर्षांतील सगळ्या गोष्टी असणार आहेत. आतापर्यंत कुणी ऐकले नसतील, माहिती नसतील, असे विषय आहेत.

## मोठी बातमी ! भोसरी भूखंड प्रकरणात खडसेंसह पत्नी, जावयाला जामीन मंजूर



जळगाव : भोसरी येथील कथित भूखंड गैरव्यवहार प्रकरणात आमदार एकनाथ खडसे आणि त्यांच्या पत्नी व जावई यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे मोठा दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे.एकनाथराव खडसे हे महसूलमंत्री असतांना त्यांच्या पत्नी आणि जावई यांनी भोसरी येथील खरेदी केलेला भूखंड वादाच्या भोवर्यात सापडला होता. या प्रकरणामुळे खडसेंना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. या प्रकरणी त्यांची इडीने चौकशी देखील केली होती. तर याच प्रकरणात त्यांचे जावई गिरीश दयाराम चौधरी यांना सुमारे दोन वर्ष कारागृहात काढावे लागले होते.दरम्यान, या कथित भूखंड घोटाळा प्रकरणी ११ ऑक्टोबर २०२३ रोजी आरोपींवर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. यात २४ नोव्हेंबर २०२३ ला खडसे यांच्यासह दोघांना अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. यानंतर आता न्यायालयाने अंतरिम जामिनाच्याच अटी -शर्तींवर खडसे यांच्यासह पत्नी मंदा खडसे आणि जावई गिरीश दयाराम चौधरी यांना नियमीत जामीन मंजूर केला आहे. यामुळे एकनाथ खडसे आणि त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे.

## लातूरच्या उपेंद्र आणि कृष्णाच्या 'एआय' बेस्ड स्मार्ट वॉचला पेटंट!



लातूर : युवा अभियंते उपेंद्र कुलकर्णी आणि कृष्णा देशपांडे यांना केंद्र सरकारचे इनोव्हेशन कॅटेगरी मधील सेफ्टी सेंसर बेस्ड टचस्क्रीन मल्टीफिचर्ड ड्युअल मोड वॉच सिस्टीमला पेटेंट मिळाले आहे.लॉकडाऊन काळात उपेंद्र आणि कृष्णा यांनी एकाच डिव्हाइसमध्ये एक आयडिया घेऊन स्मार्ट वॉच तयार करण्याचे काम हाती घेऊन पूर्ण केले. या प्रकल्पाला केंद्र शासनाचे पेटंट मिळाले.या वॉचमध्ये ३० पेक्षा अधिक फिचर्स आहेत. जसे की, रेडिएशन इंडीकेटर, स्विच पॅनेल, वाय-फाय राउटर, कॅमेरा, मायक्रो प्रोजेक्टर, स्पीकर, शॉक अब्सॉरबर, मायक्रोफोन, एल. डी. आर सेंसर, चार्जर सॉकेट, इमर्जन्सी बटन, सोलार पॅनेल, आरएफप्रोब, रिचार्जेबल बॅटरी, अँटिना, स्मार्ट ग्लास, अनालॉग घड्याळ, लॅम्प, युएसबी आदी फीचर्सचा समावेश आहे.घड्याळ 'एआय'वर आधारित या वॉचला विशेष सेंसरचा केला वापर आहे. जसे की, तापमान, ऑक्सिजन, हवा, गॅस लिकेज, स्मोक आणि फायर. शिवाय, यामध्ये असलेला अँटिना हा २० हर्टझ् ते ५ गिगाहर्टझ् फ्रिक्वेन्सीसाठी सपोर्ट करतो. आरएफ प्रोब उच्चतम विद्युत विकिरण समाविष्ट करून (रेडियो फ्रिक्वेन्सी) विकिरण, उपयुक्त सेंसर आणि सर्किट्री वापरून, विद्युत विकिरणाचे माप करतो. २७ ऑगस्ट २०२० पासून वॉच तयार करण्याचे काम केले.

## पादचा-यांच्या अंगावर रंग, पाणी उडविल्यास होणार कारवाई

मुंबई : मोठ्या उत्साहात साज-या करण्यात येणा-या होळी आणि धुलीवंदनाच्या दिवशी कोणतीही अनुचीत घटना घडू नये यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. तसेच, पोलिसांनी गस्तीवर भर दिलेला आहे. दुसरीकडे, सार्वजनिक ठिकाणी अंधाधुंदपणे रंगीत पाणी, रंग उडविणे आणि अश्लिल टीका टिप्पणी केल्यास थेट कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.मुंबईतील गर्दीची ठिकाणे मॉल्स, बाजारपेठा, धार्मिक स्थळे आणि चौपाट्यांवर सीसीटिव्हींच्या माध्यमातून करडी नजर ठेऊन महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथकांकडून गस्त घालण्यात येत आहे. साध्या गणवेशातील पोलीसही सर्व घडामोडीवर लक्ष ठेवून असणार आहे. दुसरीकडे निर्भया पथकाकडून गस्त सुरूच असून, काहीही मदत लागल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहनही पोलिसांकडून करण्यात येत आहे. नियंत्रण कक्षातून सर्व घडामोडीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सार्वजनिक ठिकाणी अंधाधुंदपणे रंगीत पाणी शपिंडणे आणि अश्लिल बोलणे यामुळे जातीय तणाव आणि सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता असते. २३ मार्च ते २९ मार्च दरम्यान अश्लील टीका टिप्पणी, गाणे, तसेच अश्लील इशारे, फलकांचा वापर करू करू नये. पादचा-यांवर रंगीत पाणी, रंग किंवा पावडर फवारणे किंवा फेकणे तसेच, रंगीत किंवा साध्या पाण्याने भरलेले फुगे फेकण्यावर बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३५ नुसार शिक्षा केली जाणार आहे.

## संपादकीय....

# ‘पाणी’ग्रहण!

भारतातल्या पाणी उपलब्धतेबद्दल जागतिक बँकेने चिंता व्यक्त केली, इतक्या गंभीर पातळीला आपण गेल्या सात दशकांत पोहोचलो आहोत निवडणुकांच्या ऐन धामधुमीत ‘लोकसत्ता’ने गुरुवारी (२१ मार्च) राज्यातील पाणीटंचाईचे गांभीर्य दर्शवणाऱ्या वृत्तास मुख्य मथळ्याचे स्थान दिले. मार्चदेखील अजून संपलेला नाही आणि राज्यातील सुमारे तीन हजार गावे आताच टँकरग्रस्त झाली असून धरणांतील सरासरी पाणीसाठा जेमतेम ४१ टक्क्यांवर आलेला आहे. दक्षिणेतील आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा आणि केरळ या राज्यांतील जलसाठ्यांमधील पाण्याची पातळी आताच सरासरी २८ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. त्यातही आंध्र प्रदेश (२२ टक्के) आणि कर्नाटक (२९ टक्के) या दोन राज्यांतील स्थिती अधिक गंभीर दिसते. तुलनेने केरळमध्ये गेल्या दहा वर्षांतील ५४ टक्क्यांच्या सरासरीपेक्षा यंदा ४९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तेलंगणमध्येही ही स्थिती सरासरी ५९ टक्क्यांवरून ४२ टक्क्यांपर्यंत खाली आली आहे. पुढील दोन महिन्यांत ही स्थिती अधिक गंभीर होणार असल्याने त्याचे परिणाम तेथील नागरिकांना भोगावे लागणार आहेत. या भयावह वास्तवाची झलक बंगळूरुत सध्या पाहावयास मिळते.त्याच्या दर्शनाने खरे तर सगळ्यांच्याच घशास कोरड पडायला हवी. तथापि याला पाड, त्याला फोड, तिसऱ्याला झोपव, चौथ्याला संपव अशा खेळांत मग्न असलेल्या एकाही राजकीय पक्षास या संकटाच्या गांभीर्याची जाणीव असल्याचे दिसत नाही. त्यात यंदाचा उन्हाळा तीव्र असेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे; म्हणजे पुढील किमान तीन महिने देशातील बहुसंख्य नागरिकांसमोर पाण्याचा प्रश्न ‘आ’ वासून उभा राहणार. जगाची १८ टक्के लोकसंख्या भारतात आहे आणि त्यांना पाण्याच्या केवळ चार टक्के स्रोतावरच अवलंबून राहावे लागते. या स्थितीमुळे भारत हा जगातील पाण्याची टंचाई असणारा देश असेल, असा जागतिक बँकेचा अंदाज आहे. पाण्याच्या अनिर्बंध वापरावर तातडीने कारवाई केली नाही आणि पाण्याचा प्रत्येक थेंब साठवून तो जपूनच वापरण्याची सवय लागली नाही, तर या देशातील अनेक राज्यांसमोर अस्तित्वाचे आव्हानही उभे राहू शकते. नागरीकरणाचा वाढता वेग, वाढती लोकसंख्या आणि पाण्याच्या साठवणुकीची तोकडी व्यवस्था यामुळे गेल्या सात दशकांत देशातील दरडोई पाण्याची उपलब्धता सन १९५१ मधील ५,१७८ किलोलिटरवरून १,४८६ किलोलिटर इतकी कमी झाली आहे. आणखी अडीच दशकांतच ती १,२२८ किलोलिटर इतकी खालावण्याची शक्यता आहे. माणशी किमान १७०० किलोलिटर पाण्याची उपलब्धता असणे आवश्यक असताना भारतात मात्र ती नाही. याचा अर्थ येत्या काही दशकांत पाण्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही, तर नागरिकांच्या अडचणींना पारावार उरणार नाही. हे असे घडते, याचे कारण गेल्या साडेसात दशकांत पाणी हा विषय कोणत्याच पातळीवर महत्त्वाचा मानला गेला नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भाक्रा नानगलसारख्या प्रचंड धरणांची निर्मिती झाली. मग अनेक राज्यांत धरणे उभारली गेली. पाण्याची ही साठवणूक भविष्यातील गरज भागवू शकणार आहे किंवा नाही, याचा विचार मात्र दूरदृष्टीने झाला नाही. त्यामुळेच मागेल त्याला हवे तेवढे पाणी पुरवण्याच्या हव्यासापायी पाण्याची नासाडी होत राहिली. निसर्गदत्त असलेल्या या देणगीचा आपल्या आणि वातावरणाच्या अस्तित्वाशी थेट संबंध आहे, हे लक्षात घेऊन पाण्याबाबत जे नियोजन करायला हवे होते, ते झाले नाही, ही वस्तुस्थिती आता डोळ्यांत पाणी आणणारी ठरते आहे.पाण्याचे हे वास्तव, त्याच्या वापराच्या प्राधान्यक्रमाशी निगडित आहे. पिण्यासाठी, शेतीसाठी, उद्योगासाठी आणि वीजनिर्मितीसाठी पाण्याचा उपयोग करणे आवश्यक असताना, त्याचा प्राधान्यक्रम दरवर्षी उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्यावर अवलंबून ठेवला जातो. याचे कारण वर्षातील केवळ चार महिने या देशात पाऊस पडतो. त्या काळात जमिनीवर पडणारा प्रत्येक थेंब साठवणे, त्याचा सुयोग्य वापर करण्यासाठी जी प्रचंड यंत्रणा उभी करायला हवी, त्याकडे आजवर लक्षच दिले गेले नाही. धरणे बांधली तरी त्यातील सुमारे ४० टक्के पाण्याचे वर्षभराच्या काळात बाष्पीभवन होते. शिवाय, धरणांतील पाणी ठिकठिकाणी पोहोचवण्यासाठी जे कालवे बांधले जातात, त्यातून पाण्याची अमाप चोरी होते. अशा स्थितीत साठवलेल्या पाण्याचा पुनर्वापर करण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या काही देशांत पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा पुनर्वापर करण्यावर भर दिला जातो. भारतात मात्र एकदा उपयोगात आणलेल्या पाण्यापैकी फारच थोड्या, खरे तर नगण्य म्हणता येईल इतक्या कमी पाण्यावर प्रक्रिया करून ते पुनर्वापरास योग्य केले जाते. मोठ्या शहरांत दिवसाकाठी जमा होणाऱ्या मैलापाण्यावर प्रक्रिया करून ते शेतीसाठी उपयोगात आणणे सहज शक्य असते. प्रत्यक्षात हे सगळे पाणी तसेच नद्यांमध्ये जाते. त्यामुळे या देशातील नद्याही प्रदूषणाने ग्रस्त. पर्यावरण विभागाच्या आकडेवारीनुसार देशातील ४६ टक्के नद्या प्रदूषित आहेत. त्या नद्यांमधील पाण्याचा कोणत्याही कारणासाठी वापर शक्य नसल्याने, त्या निरुपयोगी ठरण्याचा धोका आहे. देशातील महत्त्वाच्या सुमारे १५० जलसाठ्यांमध्ये आजमितीस केवळ ४० टक्के पाणी उरल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. नद्यांमधील पाण्याच्या स्वच्छतेच्या निर्देशांकाचा विचार केल्यास दिल्लीतील बहुतेक सर्व नद्याही कमालीच्या अस्वच्छ.आकाशातून पडणारे पाणी जमिनीत झिरपल्याने भूगर्भातील पाणीसाठा वाढत राहतो. गेल्या काही दशकांत हा साठाही झपाट्याने कमी होत चालला आहे. उत्तरेतील चार राज्यांत भूगर्भातील पाणीसाठ्यावर अतिरेकी आक्रमण झाल्याने जलस्रोत मोठ्या प्रमाणावर आटू लागले आहेत. पंजाबमधील ८.७ टक्के जिल्हे, तर राजस्थानातील १२.१ टक्के आणि हरियाणातील १३.६ टक्के जिल्ह्यांतील भूगर्भातील जलसाठा कसाबसा किमान पातळीवर असल्याचे दिसून येते. भूगर्भातील पाणीसाठ्याची अचूक आकडेवारी गोळा करणाऱ्या देशातील ११३८ नियंत्रक स्थानकांपैकी ५६ टक्के स्थानकांकडे या जलसाठ्याची माहितीच उपलब्ध नाही. उत्तरेकडील, जैसलमेर, गुरुग्राम, जयपूर या शहरांमध्ये तर भूगर्भातील जलसाठ्यांवर झालेले अतिक्रमण प्रचंड म्हणावे इतके आहे. अलीकडच्या २०१६ ते २०२३ या काळात देशातील २३४ जिल्ह्यांमध्ये भूगर्भातील पाणी उपसण्याचे प्रमाण मर्यादेपेक्षा अधिक होते. तर ७७ जिल्ह्यांत ते कितीतरी अधिक होते.एका बाजूला पाण्याची कमतरता, दुसरीकडे भूगर्भातील कमी होत जाणारी पातळी, तिसऱ्या बाजूला पाण्याची नासाडी आणि चौथ्या बाजूला साठवणुकीची अपुरी व्यवस्था अशी चहुबाजूंनी या देशातील पाण्याच्या प्रश्नाला घेरले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्याचा प्रारंभ करणारी २१ व २२ मार्च १९२० रोजी माणगाव येथे झालेली अस्पृशांची ऐतिहासिक परिषद..!




राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत झालेल्या माणगाव परिषदेचे संग्रहित छायाचित्र.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत २१ व २२ मार्च १९२० रोजी कोल्हापूर येथील माणगाव येथे अस्पृशांची परिषद झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज या दोन महामानावांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते ते आपल्याला इतिहासात अनेक ठिकाणी पाहायला मिळतात. माणगाव येथील परिषदेत पहिल्याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात बोलत असतांना, इथल्या अस्पृशांच्या राजकीय, सामाजिक, गुलामगिरीला,त्यांच्या दुः खाला इथल्या मनुवादी व्यवस्था जबाबदार असल्याचे त्यांनी सांगितले. आपण सर्वांनी मिळून त्या विरोधात बंड पुकारून आवाज उठवण्याचे आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. तर त्याच परिषेदेत दुसऱ्या दिवशी म्हणजेच २२ मार्च रोजी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या भाषणात, कोल्हापूर संस्थानात अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी, महार वतन आणि ब्राह्मणी कुलकर्णी वतनाची जुलुमी प्रथा नष्ट करणे, सर्वच जातींतील लोकांना, तलाठी, वकील म्हणून काम करण्याची संधी मिळने, असे अनेक महत्वपूर्ण निर्णय शाहू महाराजांनी घेऊन एका प्रकारे अस्पृशांना न्याय देण्याचे काम केले. राजषी शाहू महाराज परिषदेतील लोकांना संबोधित असतांना म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रुपात, तुमचा खरा पुढारी तुम्ही हिरा निवडला आहे, त्या बद्दल अभिनंदन. पुढे म्हणाले माझी खात्री आहे की डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाही इतकेच नाही तर एक वेळ अशी येईल की ते सर्व हिंदुस्तानाचे पुढारी होतील.

मानगाव परिषदेमुळे छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही नवी जोडी महाराष्ट्राच्या सामाजिक शिक्षितजावर निर्माण झाली आणि यानिमित्ताने स्पृश्य जातीतील लोकांना प्रतिनिधित्व मिळायला लागले. त्यांना मानसन्माची वागणूक मिळायला लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच यापुढे देशातील अस्पृश्य दलित वर्गाचे नेतृत्व करतील अशी ऐतिहासिक घोषणा याच माणगावच्या परिषदेत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजानिक आयुष्याच्या प्रारंभ २१ व २२ मार्च १९२० साली आयोजित केलेल्या मानगावच्या परिषेदेतेच झाला. आणि संपूर्ण देशभर अस्पृश्योद्धाराच्या नव्या पर्वाला सुरुवात करणारी हिच पहिली अस्पृश्य परिषद ठरली..! आजच्या या ऐतिहासिक दिनानिमित्त, छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन..

# बाबासाहेबांनी सांगितलेली एक गोष्ट तीन बैल एक वाघ.

वंचित बहुजन आघडी आणि शिवसेना यांची युती झाली असे आपण वृतपत्रात वाचत आलो.वृतवाहिन्यावर बेकिंग न्यूज पाहत आलो.समाजात एक चांगला संदेश गेला. प्रबोधनकार ठाकरे यांचा नातू आणि विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा नातू एकत्र येऊन निवडणुका लढणार हा वैचारिक क्रांतिकारी बदल राज्यातील नागरिकांना मोठा धक्का देणारा ठरेल अशी स्वप्न पडायला लागली.महाविकास आघाडीत वंचित नसला तरी शिवसेने सोबत असेल असे अंदाज सर्वच जाणकार बांधायला लागले.पुढे काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांची महाविकास आघाडी वंचित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या वंचित बहुजन आघडीला कशी स्वीकारेल ही मोठी समस्या होती. कारण या तिन्ही पक्षातील जात दांडगे धन दांडगे मराठे म्हणजेच रक्त पिणारे वाघ आहेत. ते वंचित समाजाच्या गरीब बैलांना आपल्या सत्तेच्या कुरणात घुसू देतील हे शक्य वाटत नव्हते.परंतु राजकारणात कधी ही काही होऊ शकते.शेवटी राजकारण असते.ते संधी वर मात करून करावे लागते.अशा वेळी बाबासाहेबांनी सांगितलेली एक तीन बैल एक वाघ यांची गोष्ट मला आठवली ती इथे वाचका समोर मांडतो.

१९५२ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर कायदे मंत्री पदाचा राजीनामा देऊन केंद्रीय मंत्री मंडळालातून बाहेर पडले होते.तेव्हा निपाणी जिल्हा.बेळगाव कर्नाटक या ठिकाणी त्यांची एका दिवशी सभा होती त्या दिवशी दुपारी ३:०० वाजता बाबासाहेब आले.तिथे त्यांनी तीन बैलांमध्ये वाघाने कशी बेकी केली,ती गोष्ट पुढील प्रमाणे बाबासाहेबानी सांगितली होती.महाविकास आघाडी त्यातील सर्व घटक पक्ष आणि वंचित आघाडी यातील जागा वाटप करण्याच्या बैठकीत वंचितला मिळणारी वागणूक ही या वाघ व तीन बैलाच्या गोष्टीशी जुळणारी आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भाषनाला सुरुवात करण्यापूर्वी सर्व जनसमूदायावर नजर टाकली,आणि धिरगंभीर आवाजात म्हणाले,माझ्या बंधू आणि भगनीनो ! तुमच्या उद्धारासाठी मला ज्या ज्या मार्गाने व जे जे करता येणे शक्य होते,ते मी केले आहे.तुम्हास जे सांगावयाचे होते,ते मी सांगितले आहे.या पुढे तुम्हाला शिक्षण,संघटना व हक्कांसाठी सतत संघर्ष करावा लागणार आहे. संघर्षाशिवाय तुम्हाला मागून न्याय मिळणार नाही.आपल्या पुढे अनेक संकटे उभी आहेत.त्यांच्याशी तुम्हाला संघटितपणे मुकाबला करावा लागणार आहे.अशा वेळी तुम्ही सर्व मागासवर्गीय जाती,जमातींनी संघटित झाले पाहिजे,तुमच्यात जर एकी झाली नाही,तर तीन बैलांच्या एकीत बेकी निर्माण करून,वाघाने त्यांचा कसा फडशा पाडला तशीच तुमची गत होईल.

एक फार मोठे कुरण होते.त्यात तीन बैल नेहमी चरावयास येत असत.ते एकमेकांचे फारच जीवलग मित्र होते.ते नेहमी एकत्र रहात,एकत्र गवत खात.एकमेकांवर प्रेम करीत.एक विचाराने वागत. एकमेकांना मदत करीत.सारी कामे एकत्र राहून एका मनाने करीत. ते बैल खूप सशक्त होते.ते खूप सुखी होते.चांगले लट्ठ पोसलेले होते. एका वाघाने त्यांना पाहिले.त्याच्या तोंडाला पाणी सुटले.यातला एक तरी बैल आपण खावा. असे त्याच्या मनात आले.वाघ होता खूप बलवान.शिकारी करून खाणे हे त्याचे रोजचे काम. परंतु बैलांना मारून खाणे काही केल्या जमेना.कारण ते संघटितपणे रहात होते. वाघाने त्यांना मारण्यासाठी खूप प्रयत्न केला.परंतु ते तिघे एकत्रच असत.एकत्र चालून येत.तिघेही एकत्र शिंगे रोखीत आणि वाघाला ’आमच्या पुढे येऊन तर पहा’ असे म्हणत.बैलांची शिंगे टोकदार होती.त्याच्या अंगात शक्ती होती.वाघाला त्यांना मारण्यासाठी हिम्मत होत नव्हती.वाघ बैलांना मारण्यासाठी रात्रंदिवस विचार करीत होता.त्याला झोप लागत नव्हती.अखेर त्याने खूप विचार केला.मनात काही बेत ठरविला.तो रानात दुसरीकडे गेला.तेथे इतर पशूना भेटला.तेथे त्या सगळ्यांशी बोलला.फक्त त्या बैलांबाबत बोलला.खोटे नाटे बोलला.चुगलीची सर्वांना गोडी असते.बहुतेकांना वाईट करणे आवडते. तेच तेच पुन्हा बोलणे आवडते.साऱ्या पशुनी तेच केले.तेही आपापसात बोलू लागले.बैलांची निंदा करू लागले. त्या बैलांच्या कुरणात गेले.एकेका बैलाला अलग अलग बोलावून त्यांच्यात बेकी कशी होईल.अशा प्रकारे सांगू लागले.त्याचा वाईट परिणाम झाला.त्यांचं एकमेका वरील प्रेम,विश्वास उडाला.त्यांना एकमेकांचा संशय वाटू लागला.ते एकमेकांचे शत्रू झाले.एकीमध्ये बेकी झाली.स्नेह होता तोही संपला.ते एक एकटे राहू लागल,फिरू लागले,एकमेकांशी बोलणे सोडून दिले.तीन बाजूनी तीन गेले. वाघाला तीन बैलांमध्ये बेकी हवीच होती.तो पुन्हा कुरणात आला. एक एकाशी अलग अलग लढला. त्याने एकेकाचा पराभव केला. त्यांचा प्राण घेतला. त्याना खाऊन टाकले. अशा तर्हेने त्याने तीन बैल फस्त केले.यातून आपण काय बोध घेणार आहोत.

तीन बैलांची एकी होती,तो पर्यत वाघ बैलांच्या वाटेला जाऊ शकत नव्हता.परंतु त्यांच्या मध्ये बेकी करून त्याने बैलांचा प्राण घेतला.आणि त्यांना खाऊन टाकले.त्याच प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संघटनेतील कार्यकर्त्या मध्ये फूट पाडून आपल्या पक्षात घेऊन जाणारे काही राजकीय पक्ष आणि इतर काही संघटना या भारत देशात आहेत.बैलांना बुद्धी नव्हती.म्हणून त्यांच्यात वाघाने बेकी केली.परंतु आम्ही भगवान बुद्धाला मानणारे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पूज्य मानणारे लोक,बैला सारखी बेकी करतो.आणि आपला नाश करून घेतो.मग बैलात आणि आमच्यात काय फरक आहे?.बैलानी बेकी केली नसती,तर त्यांचा प्राण गेला नसता.आम्ही जर मजबूत असलो तर जगातील कोणतीही शक्ती आमच्यात बेकी करणार नाही.बेकी झाली नाही आणि एकी असेल तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या म्हणण्याप्रमाणे भारताचाच नव्हे,तर जगाचा उद्धार करू शकतो.परंतु आम्ही कमजोर आहोत. स्वार्थी आहोत.म्हणून आम्ही बेकीने राहतो.आमच्या बेकीचा फायदा इतर लोक घेतात.राजसत्ता मिळवितात आणि मजा करतात.बेकीमुळे बैलांचा नाश झाला.तसा आमचाही होत आहे. म्हणून एकीने रहा.असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने घेतलेली मतदार संख्या आणि टक्केवारी अनेकांना धडकी भरणारी आहे.गेल्या वर्षभरात राज्यात वंचितच्या जाहीर सभा दखल पात्र ठरल्या आहेत. शिवसेने सोबत झालेली युती आणि आजची परिस्थिति चिंताजनक आहे. त्यामुळेच महाविकास आघाडीत वंचित कुठे असेल हे सांगता येत नाही.पण बहुजन समाजातील एकजुटीला वैचारिक गोंधळ,गैरसमज निर्माण करण्यास यशस्वी होतांना दिसत आहे.परंतु आम्ही कमजोर आहोत.स्वार्थी आहोत. म्हणून आम्ही बेकीने राहतो.आमच्या बेकीचा फायदा इतर लोक घेतात.राजसत्ता मिळवितात आणि मजा करतात.बेकीमुळे बैलांचा नाश झाला.तसा आमचाही होत आहे.म्हणून एकीने रहा.असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगत असत.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत एकीने मतदान करा.कुठल्याही अमिशाला बळी पडू नका. आपला खासदार निवडून येणार नाही ही मनातील भीती काढून टाका. आपली मतदार संख्या निवडणुकीत दाखवून द्या. मग आपलाच उमेदवार खासदार म्हणून निवडून येऊ शकतो. होऊ शकत नाही,शक्य नाही हे प्रथम मनातून काढून टाका.

************

**सागर रामभाऊ तायडे,**
**९९२०४०३८५९,**
**भांडुप,मुंबई.**

# विश्वकर्मीय सुतार समाज नेत्यांनी विश्वकर्मा राजकीय आघाडी स्थापन करावी!

विश्वकर्मीय सुतार समाजाची लोकसंख्या राज्यभरात ३६ जिल्ह्यातील ३६० तालुक्यातील अंदाजे ५० लाखाच्या जवळपास असल्याचे माझ्या सोशल मीडियावर वाचनात आले आहे विश्वकर्मीय सुतार समाज हा ओबीसी प्रवर्गातील मोठा ओबीसी घटक आहे याची कल्पना समाजातील सर्वच दिग्गज समाज नेत्यांना आहे आणि समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा मुकुट परिधान केलेल्या असंख्य सामाजिक संघटना कार्यरत आहेत यामध्ये काही युवक संघटना यांचा सुद्धा समावेश असतो आणि याच राज्यस्तरीय सामाजिक संघटनेच्या कार्यकरिणी मंडळावर जबाबदार कर्तृत्ववान असणाऱ्या सामाजिक क्षेत्रातील सामाजिक,राजकीय क्षेत्रातील कार्याचा दांडगा अनुभव असलेल्या विद्वान हुशार सर्वगुणसंपन्न सुशिक्षित बुद्धिवान पदाधिकारी वर्गाची निवड केली जाते.

या पदाधिकारी वर्गामधुनच प्रत्येक सामाजिक संघटनेवर एका जबाबदार कर्तृत्ववान कर्तबगार प्रमुखाची सर्वानुमते निवड केली जाते आणि कालांतराने हेच संघटनेचे प्रमुख विश्वकर्मीय सुतार समाजात कळत न कळत समाज नेतृत्व आणि धडाकेबाज युवक नेतृत्व म्हणुन उदयास येतात अशा पध्दतीने संपूर्ण विश्वकर्मीय सुतार समाजात विविध पातळीवर राज्यस्तरीय समाज नेते सोबतच धडाकेबाज युवक नेते उदयास येतात आणि समाजात समाज नेतेगिरी करतात समाजात यांना मानसन्मान सुद्धा मिळतो.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला सत्ता संपत्ती ज्ञान आणि राजकीय हिस्सेदारी मिळणे गरजेचे आहे समाजाचा सामाजिक सर्वांगीण विकास करायचा असेल तर मात्र विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला राजकीय हिस्सेदारी मध्ये सहभागी होणे गरजेचे असते.सद्यस्थितीत राज्यात राजकीय निवडणुकीचे वातावरण तयार झाले असून सर्वच राजकीय पक्ष राजकीय अस्तीत्व टिकवण्यासाठी आणि राजकीय भवितव्य ठरविण्यासाठी राजकीय मैदानात उतरलेले आहेत तर दुसरीकडे बहुजन ओबीसी समूहातील विविध संघटना आणि विविध ओबीसी नेत्यांनी आपापल्या पातळीवर राजकीय मैदानात उतरण्याची तयारी केलेली आहे सद्यस्थितीत ओबीसी मुद्द्यावर आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे ओबीसींचे आरक्षण धोक्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विश्वकर्मीय सुतार समाज ओबीसी आरक्षणा पासून वंचित राहू नये यासाठी विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि त्यासाठी राजकीय क्षेत्रात समाजाचे प्रतिनिधित्व असणे गरजेचे आहे लोकसभा आणि विधानसभा सभागृहात समाजाचे प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे.

त्यासाठी विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील समाज नेत्यांनी कोणत्याही प्रस्तापित राजकीय पक्षाच्या हातचे बाहुले न बनता स्वतंत्र विश्वकर्मा राजकीय आघाडी स्थापन करावी आणि समविचारी बिगर प्रस्तापित राजकीय आघाडी सोबत हातमिळवणी करून समाजाला लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत काही जागांची मागणी करावी आणि राजकाणाच्या मुख्य प्रवाहात समाजाला सहभागी करण्यासाठी प्रयत्न करावे.समाजाचे पर्यायाने बहुजन समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकसभा आणि विधानसभा सभागृहात विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचे प्रतिनिधित्व करण्याची नितांत गरज आहे त्यासाठी विश्वकर्मा राजकीय आघाडी स्थापन करावी.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक संघटनेचे राज्यस्तरीय समाज नेते मंडळी विद्वान हुशार,बुद्धिवान,बुद्धिवादी सुशिक्षित उच्चशिक्षित,सर्वगुणसंपन्न आहेत.अनके समाज नेते आर्थिक दृष्टीने सक्षम सुद्धा नक्कीच असतील समाजातील अनेक समाज नेते विश्वकर्मा राजकीय आघाडीला आर्थिक पाठबळ देऊ शकतात यासाठी समाजातील सर्वच समाज नेत्यांनी एकत्र येऊन यासाठी आर्थिक निधीची तरतूद करावी काही प्रमाणात राज्यस्तरीय समाजाला यासाठी आर्थिक मदतीचे समाज नेत्यांनी आवाहन करावे समाज आपल्या आवाहनाला नक्कीच प्रचंड प्रतिसाद देईल आणि निवडणूक निधी जमा होईल आणि येणाऱ्या राजकीय निवडणुकीत समाजाचे कर्तबगार उमेदवार उभे करून त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावा लोकसभा आणि विधानसभा सभागृहात समाजाचे प्रतिनिधित्व करणारे लोकप्रतिनिधी समाजाला बघायचे आहेत यासाठी जागावाटपावर सामोपचाराने तोडगा काढावा.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील समाज नेत्यांनी विकासात्मक राजकीय जाहीरनामा तयार करावा समाजातील समाज नेते सुशिक्षित उच्चशिक्षित बुद्धिवान आहेत समाज नेत्यांनी राजकीय मसुदा तयार करावा आणि त्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी विश्वकर्मा राजकीय आघाडी आणि बिगर प्रस्तापित राजकीय आघाडी सोबत चर्चा करून राजकीय अजेंडा तयार करून प्रसिद्ध करावा.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाला राजकीय हिस्सेदारी मिळविण्यासाठी राजकीय निवडणुकीत समाजाचे उमेदवार उभे करणे हाच एकमेव पर्याय आहे याचा विचार स्वतःला समाज नेते समजणाऱ्या समाज नेत्यांनी करावा निवडणुकीत काही लोकसभा मतदारसंघात काही मुरब्बी समाज नेत्यांनी तर काही मतदारसंघात युवक नेत्यांनी राजकीय मैदानात उतरावे त्याच धर्तीवर विधानसभा निवडणुकीत काही मतदारसंघात मुरब्बी समाज नेत्यांनी तर काही मतदारसंघात युवक नेत्यांनी राजकीय मैदानात उतरावे अशा पध्दतीने समतोल राखावा जेणेकरून विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजाचे अनेक लोकप्रिय लोकप्रतिनिधी समाजाला मिळतील त्याचा फायदा बहुजन समाजाचे विविध प्रश्न लोकसभेत आणि विधानसभा सभागृहात सोडवण्यासाठी प्रयत्न करतील.

विश्वकर्मा राजकीय आघाडीच्या आणि सहयोगी राजकीय आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी समाज नेत्यांनी राज्यभरात ठिकठिकाणी प्रचार सभांचे आयोजन करावे यासाठी प्रचार यंत्रणा तयार करावी आपापल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना यामध्ये सहभागी करून घ्यावे.प्रचाराची धुरा समाजातील निवडक जबाबदार कार्यकर्त्यांकडे सोपविण्यात यावी विशेषतः निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी स्टार प्रचारक म्हणुन विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजातील काही विद्वान अभ्यासू युवक नेत्यांची आणि काही अनुभवी दिग्गज मातब्बर विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाज नेत्यांची नेमणूक करावी आपण राजकीय मैदानात यशस्वी नक्कीच व्हाल आणि आदर्श राज्यस्तरीय विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजासह बहुजन समाजात सुध्दा नावाजलेले नामांकित नेतृत्व करण्यासाठी पात्र ठराल.

प्रमोद सूर्यवंशी चिखली मातृतीर्थ बुलडाणा मोबाईल क्रमांक:– ८६०५५६९५२१.

# शहिदांना कोटी-कोटी प्रणाम.

आज शहिदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे.अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलिदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली.१९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले.त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन सायमन परत जाच्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.ही बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांचा अंत झाला.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारतात शोककळा पसरली. हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पाहवले नाही. त्यामुळे क्रांतिकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी दृढनिश्चय करून व्युहरचना तयार केली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले. सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली. यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही कधीही विसरणार नाही.जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोणीही विसरणार नाही. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशसेवा, सामाजिक सेवा व देशांच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशाच्या विकासासाठी, जनतेच्या हितासाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी संपूर्णपणे ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही व त्यांना राजकीय दृष्ट्या खरी श्रद्धांजली म्हणता येणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृ भुमिची रक्षा करून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी आणि देश सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की लोका सांगे ग्याण व स्वत: कोरडे पाषाण यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी करोडपती झाल्याचे दिसून येतात व करोडपती शेतकरी शुन्य झालेला दिसुन येतो.कारण आजचा राजकीय पुढारी पाच वर्षासाठी लोकप्रतिनिधी बनतो खरा परंतु पाच वर्षाच्या काळात करोडपती बनतो ही कसली देश सेवा म्हणावी.यामुळे भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब, सर्वसामान्य,शेतकरी हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली समजल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांना कोणत्याही लढाईवर जाण्याची गरज नाही.फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा व लोककल्याणाची कामे केली पाहिजे. तेंव्हाच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपूर्ण देश शहिद दिनाला शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे. परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनो थोडे ७७ वर्षे मागे वळून पहा व क्रांतिकारकांना देश स्वातंत्र्यासाठी कायकाय यातना भोगाव्या लागल्यात याचे अनुकरण करून चिंतन करा आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजसेवा करण्याची तत्परता दाखवा.कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हीत साधण्याचा प्रयत्न जास्त असतो.त्यामुळे सावधान राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही कार्य करतांना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलीदानाला कोठेही ठेच किंवा तडा पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी.शहिद दिनाच्या निमित्ताने देशवासीयांना हेच सांगु इच्छितो की देशातील वाढते प्रदुषण धोकादायक स्थितीत येवून ठेपले व प्रदूषणाच्या बाबतीत जगामध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतो.याकरीता शहिद दिनाचे औचित्य साधून राजकीय पुढारी, सामाजिक संघटना व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्यापरीने वृक्षारोपण करून जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचा संकल्प केला पाहिजे हीच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व हे वृक्ष अनंत काळापर्यंत आपल्या स्मरणात राहील आणि शहिदांचे स्मरण आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानात,फुलात,फळात दिसुन येईल.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगाजय हिंद!

************

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# वाडीचा किल्ला

गेली कित्येक वर्षे वाडीच्या किल्ल्याने मनात घर केलेले. भर उन्हाळ्यात खूप लहानपणी म्हणजे पाचवी सहावीला असेल तेव्हा गलवाडा गावाला लग्नाला गेलो होतो. तेव्हा त्या गावातून तो डोंगरी किल्ला दिसत होता. माझं कुतूहल चाळल्या गेलं. तो उंच भव्य किल्ला माझं मन वेधून घेत होता. एक आगंतूक आणि मी भर उन्हात किल्ला गाठला. किल्ल्यावर पोहोचलो तेव्हा दुपार उलटून गेलेली. भव्य असा बुरुज आणि दरवाजा पाहून मी भारावून गेलो. दूरवर नजर टाकली तेव्हा किल्ल्याचा खालील परिसर मनाला एक अदभूत आनंद देत होता. उत्तरदुपारनंतरच्या उन्हाच्या झळात सुखद गारवा आणि भणाणणारा वारा आजही तेवढाच आठवत होता. भर उन्हात किर्रकिर्र करणारा किड्याच्या निनादात परिसर धुंद झालेला. किल्ल्यावर नजर टाकली तेव्हा सर्वत्र पडझड झालेली. बरेच बुरुज ढासळलेले, त्यामुळे थोडीसी भीतीही दाटून आली. काळोख पडायच्या आत वऱ्हाडाबरोबर घरी परतायचं होतं, म्हणून तो प्रवास अर्धवट सोडून मी परतलो. पण किलल्याने माझा मनात खोल साद रुजवली, केव्हातरी तू परतून येशील.

जेव्हा केव्हा गावी जायचो,तेव्हा दूरवर दिसणारा तो डोंगर नेहमीच मला खुणावत असे, पण काहीतरी वेळ नाही म्हणून राहून जायचं. मनाला सारखी हुरहूर लागायची.

शेवटी एकदाचा ३५ वर्षांनंतर वाडीचा किल्ला गाठला.आषाढाचा महिना. दोनतीनदा पाऊस होऊन गेलेला . त्यामुळे सभोवार दूरवर नुकत्याच भुछत्र फोडून अंकुर डोकावत होते. घनगर्द आषाढछायेचा सभोवार पिसारा फुललेला. हळुवार गार वारा सर्वत्र होता. कोरोनाची स्मशानशांतता सर्वत्र दाटलेली. हळदयाच्या रस्त्याने किल्ल्याच्या मुख्यद्वाराकडून जायचं ठरवलं. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले वाडीगाव ते वर किल्ल्याच्या मुख्यद्वारापर्यंत आता डांबरी सडक आहे, हिरव्यागार वनराईत ती सडक उठून दिसत होती. ही सडक वळणवळणं घेत वर हळदयाकडे गेलेली. सडकेच्या दुतर्फा असलेली लहान लहान झाडं मन वेधून घेत होती. त्या जंगलातून विविध पक्ष्याची किलबिल कानी येत होती. ही सर्व पाखरं अनोखी होती. वळणावळणाने वर जाताना एक वेगळाच उत्साह मनात भरलेला. कितीतरी वर्षांनी वर किल्लाकडे खालून पाहताना चित्त आकर्षत होतं..मी लहानपणी पाहिलेल्या त्या किल्ल्याची आता डागडुजी केलेली दिसत होती, त्यामुळे ते ऐतिहासिकपण किल्ल्यात जाणवत नव्हतं, तरीही तो किल्ला बघण्याची आतुरता जराही कमी झालेली नव्हती. किल्ल्याच्या मुख्यदाराजवळ पोहोचलो, तेव्हा किल्ल्याच्यासमोर मनोरा दिसला. सडकेच्या त्या बाजूला असलेला तो मनोरा मन वेधून घेत होता. त्या मनोऱ्यावर चढून सभोवार नजर टाकली, तेव्हा तो आनंद शब्दात सांगण्यासारखा नव्हता. दूरवर खानदेश दिसत होते,क्षितिज धुरकट दिसत होते. तर दूरवरची जलाशय आपलं अस्तित्व अधोरेखित करत होते. त्या उंच मनोऱ्यावरून समोरच विहंगम दृश्य स्वप्नवत वाटत होतं. वर आकाशाकडे पाहिलं तर बहिरी ससाणा गिरट्या घालत होता. तर खाली पायथ्याशी सभोवार पसरलेलं जंगल ग्रीष्म पालवीने नवनवेलं झालं होतं. त्या जंगलातून म्याऊ म्याऊ असा मोरस्वर आसमंत व्यापून टाकत मंगलमय करत होता. ते दृश्य साठवून किल्ल्याच्या मुख्यप्रवेशदाराजवळ आलो.

भव्यउंच काळ्याभोर दगडाच्या बुरुजच्या बाजूला मुख्य प्रवेशद्वार, तेही भव्यच होते. वर पायऱ्या चढत असताना भणाणलेला गार वारा मनाला सुखावून टाकत होता. प्रवेशद्वाराच्या भिंतीवर हत्ती आणि विचित्र प्राणी यांची शिल्प कोरलेली होती. मुख्यद्वार ते उपद्वार यामध्ये पाच ते दहा मीटरचे अंतर होते. त्या अंतरामध्ये द्वारपालाची छोटीशी खोली होती, त्या खोलीच्या बाजूला छोटसं पाण्याचे कुंड होतं. उपद्वारापासून उजवीकडे असलेल्या बुरुजावर जुन्या तोफा पडलेल्या. या तोफा आजही जशाच्या तशा पडलेल्या आहेत. त्या तोफा पाहून माणूस सोळाव्या शतकात किती युद्धखोर होता, याची जाणीव होते.पण दुसरीकडे किल्ल्याकडे पाहिलं तर स्थापत्यशास्त्र किती अप्रतिम होतं, याचीही जाण होते. पण त्याचबरोबर त्या काळातील कामगारांचा विचार मनात आला, ज्या हातानी हा किल्ला बांधला. त्या हातांनी इतक्या उंचीवर हे एवढे मोठमोठे दगड कसे आणली असतील, कुठली साधने वापरली असतील, याचा डोक्यात विचार येताच थोडसं त्यांच्याविषयी कळवळा आला. त्या कामगारांना सलाम करावासा वाटला.

प्रवेशदाराच्या उजव्या बुरुजावरून किल्ल्याची भटकंती करण्यास सुरुवात केली. अजूनही आषाढछाया होती. दरीतून येणाऱ्या म्याऊ म्याऊ मोरस्वर सभोवार घुमत होता. बालेकिल्ल्यावर पोहोचलो, तेव्हा घनदाट सिताफळाचे रान दिसले. त्याच रानात पागा होता. संपूर्ण काळयादगडात तो बांधलेला होता,तो एक पागा म्हणजे प्रकारे ते भुयारच होते. ते भुयार म्हणजे पाख्यांचा अड्डा झालेला. त्यांचा चिरचिर आवाज आणि अक्राळविक्राळ आकार बघून पागा भितीमय झाला होता.बालेकिल्लामध्ये भव्य अशा खोल्या आज मोडकळीस आलेल्या, त्यांची प्रचंड पडझड झालेली दिसते.एकेकाळी या खोल्या वैभवशाली असतील याच्या खाणाखुणा त्या ठिकाणी दिसत होत्या. आज त्या सरंजामी खोल्या शेवटच्या घटका मोजत आहे. मनात तशी थोडशी हुरहुर दाटून आली. त्या खोल्यांच्या बाजूला खूप मोठा तलाव असून त्याच्या तळाला पूर्ण कातळ आहे. त्याच्या भिंती हा चौकोनी दगडांनी बांधलेली असून अत्यंत सुरेख बांधकाम दिसते, पण आता त्या तलावाची बरीच पडझड झाल्याचे दिसून येते. आता माझी नजर किल्ल्यावरील मैदानाकडे गेली. ते मैदान बऱ्यापैकी मोठे होते. त्या मैदानावर आता गुराखी ढोरं चारत होती. दोन तीनदा पाऊस झाल्यामुळे किल्ल्यावर अंकुर भूछत्र फोडून डोकावत होती. सर्वत्र हिरवंगार आणि गुरांच्या गळ्यातील घंटांचा नाद यामुळे वातावरणात एक गुढ प्रसन्नपणा निर्माण झाला होता. त्या मैदानातून मी दक्षिणेकडे पाहिले, अजिंठ्याची डोंगररांग सर्वत्र पसरलेली दिसते. हिरव्यागार डोंगररांगातून आणि वनराईतून शांतीरस पाझरत असल्याचे जाणवले. रम्य अशा वातावरणात मी तल्लीन असताना अचानक विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. मी धावत धावत पूर्वीच्या बुरुजाकडील एका भुयारात शिरलो. त्या भुयारात गुढ अशी शांतता पसरलेली. त्या भुयाराच्या खालच्या दरवाजातून दरीत डोकावून बघितलं, तर शेवटची घटका नदी मोजताना दिसली. तिचं पात्र पूर्णपणे कोरडं दिसलं, तिच्या पात्रातून नुकत्याच झालेल्या पावसामुळे हळुवार सुगंध वरती येत होता. थोडसं बाजूला बघितलं तेव्हा किल्ल्याच्या कडेने बांडगुळं भिंती फोडून दरीत पाहत आहेत असा भ्रम होत होता. त्यांच्या पानापानातून निसटत असलेला पाऊस एक अप्रतिम सौंदर्य न्याहाळण्याजोग होतं.त्या भुयाराच्या दक्षिणेला असलेल्या डोंगरात भग्नलेणी उठून दिसत होती. भुयारात पाऊसनादाने गुढता निर्माण केली होती. त्या भुयारात असलेले कुंड आणि पाण्याची नितळता मन वेधून घेत होती.

आता पाऊस थांबला होता. तसा मी भिंतीवरून पुढे पूर्वेकडील दरवाजाकडे वळलो . जो मी खूप लहान असताना म्हणजे ३५ वर्षांपूर्वी पाहिला होता. आता त्याची बऱ्यापैकी डागडुजी केली होती. त्या भव्य अशा दरवाजावर हत्ती,बैलआणि विचित्र प्राणी यांची शिल्प कोरलेली होती,त्याचे रहस्य आजही आपल्याला समजत नाही. दरवाजातून खाली पाहिले तर प्रचंड उताराची नागमोडी वाट खाली वाडीगावाकडे गेलेली. पायथ्याशी वाडी गाव उठून दिसत होतं. मशिदीभोवती लहान साधी घरं दिसत होती. त्या गावात प्रचंड शांतता दिसत होती. पन्नास ते साठ घरं त्या गावात असावी असं पाहिल्यावर जाणवत होतं. किल्ल्यावरून ते गाव खूप छान वाटत होतं. त्याच दरवाज्यातून समोर उत्तरेकडे पाहिलं, क्षितिज समांतर असा खानदेश भूप्रदेश दिसत होता. कदाचित खानदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठीच हा किल्ला बांधला असावा, असे वाटतं. कारण अजिंठा लेणी ते जळगाव शहरापर्यंतच्या दूरपर्यंतच्या परिसरात फक्त हा एकच किल्ला दिसतो. मग मी किल्ल्याच्या रुंद भिंतीवरून चालत सैनिकांसाठी बांधलेल्या खंदक पाहत पुढे गेलो. या खंदकात लहान लहान खोल्या सुद्धा दिसतात. या खंदकामध्ये लपून शत्रु सैन्यावर नियंत्रण ठेवता येत असावं. आता बराच वेळ झाला होता. संपूर्ण किल्ला जवळपास पाहून झाला होता. हे ऐतिहासिक सौंदर्य आणि वैभव पाहून कुठेतरी हा वारसा आपण जपत नसल्याची खंत मनाला लागली. असे लहान लहान अनेक किल्ले या मातीमध्ये अजूनही आपली वाट पाहत आहेत, भुरळ घालत पुन्हा पुन्हा येण्यासाठी साथ घालतात. पुन्हा नव्याने एक गूढ रम्यता उमजायला लागते.

*******

**अनिल भालेराव**

# 'मुळे हार्ट अटॅकचा वाढतो धोका? अभ्यासातून धक्कादायक वास्तव उघड




सध्या प्रत्येकाची जीवनशैली बदलली आहे. जवळ-जवळ सर्वांनाच तासनतास एकाच जागेवर बसून काम करावे लागते. यामुळे रोगांसह लठ्ठपणाही वाढतो. हाच लठ्ठपणा कमी करण्यासाठी काही लोक जीमचा पर्याय निवडतात, तर काही जण डाएट करतात. यातच आजकाल 'इंटरमिटेंट फास्टिंग' हा ट्रेंड सुरू आहे. 'इंटरमिटेंट फास्टिंग' म्हणजे काय, तर अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीसाठी उपवास ठेवणे. डाएटसारखाच वजन कमी करण्याचा हा एक उपाय आहे. 'इंटरमिटेंट फास्टिंग'ने मधुमेहाच्या रुग्णांमध्ये इन्सुलिनचे प्रमाण संतुलित होते, असेही सांगण्यात येते. परंतु, अलीकडील एका अभ्यासात धक्कादायक माहिती समोर आली आहे. 'इंटरमिटेंट फास्टिंग'मुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधित विकारामुळे होणार्या मृत्यूचा धोका ९१% वाढतो, असे या अभ्यासात समोर आले आहे.'इंटरमिटेंट फास्टिंग'मुळे हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधित विकारामुळे होणार्या मृत्यूचा धोका वाढतो, असे एका अभ्यासात समोर आले आहे. एका आंतरराष्ट्रीय परिषदेत या अभ्यासाचे निष्कर्ष सादर करण्यात आले. तज्ज्ञांनी सांगितले की, अभ्यासातील माहिती जरी निर्णायक नसली, तरी अधूनमधून उपवास केल्याने विकार उत्पन्न होऊ शकतात हे सिद्ध होते. डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय उपवास, डाएट करू नये असेही तज्ज्ञांनी सांगितले. खरंच उपवास केल्याने मृत्यूचा धोका वाढू शकतो का? तज्ज्ञ काय सांगतात? 'इंटरमिटेंट फास्टिंग' म्हणजे काय व ते कोणी आणि कसे करावे? याबद्दल सविस्तर समजून घेऊ या.'इंटरमिटेंट फास्टिंग'मध्ये तुम्ही दिवसातल्या काही ठराविक तासांमध्ये आहार घेऊ शकता. दिवसातील आठ ते १२ तासांच्या कालावधीतच तुम्ही आहार घेऊ शकता. या वेळेव्यतिरिक्त दिवसभर उपवास केला जातो. एखादी वेळ ठरवून तुम्ही आहार घेतला, त्यानंतर तुम्हाला बरेच तास काही खाता येत नाही. 'इंटरमिटेंट फास्टिंग'मध्ये १६/८ असं एक गणित आहे. त्यानुसार तुम्ही दिवसातले १६ तास खाण्यापासून दूर राहता आणि उरलेल्या ८ तासांतच काही खाऊ शकता.अशा आहाराचे पालन करणार्या काही व्यक्तींचा अनुभव एका अभ्यासात दिला आहे. या अभ्यासात तीन महिने ते एक वर्ष 'इंटरमिटेंट फास्टिंग' करणार्या व्यक्तींचा अनुभव जाणून घेण्यात आला आहे.

# भारतीय शहीद दिन: क्रांतिवीर भगतसिंग, राजगुरू व सुखदेव स्मृतिदिन विशेष.

लाहोर खटल्याचा निकाल लावण्यात येऊन शिवराम राजगुरू यांच्यासह भगतसिंग व सुखदेव यांना अतिशय गुप्तता राखत फाशी देण्यात आली. दि.२३ मार्च १९३१च्या सायंकाळी राजगुरू, भगतसिंग व सुखदेव हसत हसत फाशीला सामोरे गेले. पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यात सतलज नदीच्या काठी हुसेनीवाला येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या तिघांच्या बलिदानाचा २३ मार्च हा दिवस भारतात राष्ट्रीय शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो. अमर शहीदांचे अचाट अजरामर शौर्य श्री एन. कृष्णकुमार यांच्या शब्दशैलीतून वाचा... संपादक.

नोव्हेंबर १९२८मध्ये भगतसिंग आणि त्यांचे सहकारी शिवराम राजगुरू यांनी २१ वर्षीय ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन साँडर्सला लाहोर येथे गोळ्या घालून ठार मारले. जेम्स स्कॉट यांना ठार मारण्याचा हेतू असताना चुकून साँडर्स बळी पडला. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट याने हिंदुस्थानातील लोकप्रिय राष्ट्रवादी नेते लाला लजपत राय यांच्यावर लाठी चार्जचा आदेश देऊन त्यांना जबर जखमी केले. त्यामुळे लाला लजपत राय दोन आठवड्यांनंतर मरण पावले. त्यांच्या मृत्यूचा बदला म्हणून भगतसिंगांनी स्कॉटला मारण्याचा बेत केला होता. त्याच्या या कटात चंद्रशेखर आझाद व शिवराम हरी राजगुरू सहभागी होते. त्यानंतर भगतसिंग व राजगुरू यांचा शोध घेत असल्याचे पाहून चंद्रशेखर आझाद यांनी चानन सिंघ नावाच्या भारतीय पोलिस अधिकाऱ्याला मारले.

भगतसिंग: हे एक भारतीय क्रांतिकारक होते. हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याविरुद्धच्या लढ्यात त्यांनी केलेल्या दोन हिंसात्मक कार्यांमुळे वयाच्या २३व्या वर्षी त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. भगतसिंगांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९०७ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतातील ल्यालंपूर जिल्ह्यातील बंगा गावात झाला. त्याच्या आईचे नाव विद्यावती व वडिलांचे किशनसिंग होते. ज्यावेळेस त्याच्या वडिलांची व दोन काकांची तुरुंगातून सुटका झाली, त्याच सुमारास भगतसिंगांचा जन्म झाला. त्यांच्या कुटुंबातील बरेच सदस्य भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले होते, तर काही महाराजा रणजितसिंगाच्या सैन्यात होते. काही कुटुंबीय सामाजिक कार्यांमध्ये सक्रिय होते. त्याचे वडील व काका हे करतारसिंग साराभाई व हर दयाल यांच्या गदर पार्टीचे सदस्य होते. दि.९ सप्टेंबर १९२५ रोजी भगतसिंगांच्या पुढाकाराने व आग्रहाने क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे नाव हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन असे ठेवण्यात आले. असोसिएशन हा भाग समाजप्रबोधन, माहितीपत्रके, साहित्य सामग्रीची जमवाजमव, भूमिगतांना आश्रय देणे यासाठी तर आर्मी हा भाग प्रत्यक्ष क्रांतिकार्यासाठी असे विभाजन केले गेले. हुतात्मा चंद्रशेखर आझाद हे मुख्य समन्वयक व सेनेचे मुख्य सेनापती तर भगतसिंग यांच्यावर संघटनेचे समन्वयक व दोहोंचे सदस्य व नियंत्रक अशी कामगिरी सोपविली गेली. या संघटनेचे स्वप्न व एकमेव ध्येय म्हणजे सशस्त्र क्रांतीद्वारे इंग्रज सरकार उलथून टाकून भारतीय संघराज्याची स्थापना केली. खून करून, दरोडे घालून वा चार इंग्रजांना ठार करून काही स्वातंत्र्य मिळणार नाही असा त्यांचा उपहास वा धिक्कार केला गेला, तरी प्रत्यक्ष त्यांचे कार्य हे साक्षात राजसत्ता उलथून टाकण्यासाठी केलेले एक योजनाबद्ध स्वातंत्र्यसमर होते. याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे अभियोगात सरकारने ठेवलेले आरोपपत्र होय.

शिवराम हरी राजगुरू: शिवराम राजगुरू हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात फाशी गेलेले क्रांतिकारक होते. ते हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी या संघटनेच्या क्रांतिकार्यात सहभागी झाले होते. डॉक्टर हर्डीकर यांच्या सेवा दलामध्ये असतानाच त्यांचा संबंध हा हिंदुस्तान रिपब्लिकन पार्टी या क्रांतिकारी संघटनेशी आला. चंद्रशेखर आझाद, भगत सिंग आणि सुखदेव अशा क्रांतिकारकांच्या सहवासात आल्याने ते सशस्त्र उठाव करण्यास प्रेरित झाले. नॅशनल बँकेची लूट, क्रांतिकारक जोगेश चंद्रा चॅटर्जी यांची सुटका यांतही त्यांचा सहभाग होता. राजगुरूंचा जन्म पुण्याजवळ खेड येथे दि.२४ ऑगस्ट १९०८ रोजी एका मराठी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांना रघुनाथ या नावानेही ओळखले जात असे. लहानपणी १४व्या वर्षी इंग्रजी विषयातील अपयशामुळे वडील भावाने आपल्या नवविवाहित वधूसमोर त्यांना इंग्रजी धडा वाचायची शिक्षा केली. हा अपमान राजगुरूंना सहन झाला नाही. अंगावरच्या कपड्यांनिशी आईने तेल आणण्यासाठी दिलेले ९ पैसे व बहिणीने अंजिरांसाठी दिलेल्या २ पैशांसह त्यांनी आपले घर सोडले. शिक्षणासाठी ते आधी नाशिक आणि त्यानंतर थेट काशीलाच पोहचले. काशीतील त्यांचा बराचसा वेळ हा लोकमान्य टिळक ग्रंथालयत, महाराष्ट्र विद्या मंडळातील व्याख्याने- वादविवाद ऐकण्यात आणि भारतसेवा मंडळाच्या व्यायामशाळेत लाठी-काठी, दांडपट्टा यांच्या शिक्षणात जात होता. त्याकाळी कलकत्ता, पाटणा, कानपूर, लखनौ, झांशी, मीरत, दिल्ली, लाहोर ही गावे क्रांतिकारकांची माहेरघरे होती. काशी येथील पं.मदनमोहन मालवीयांचे हिंदू विद्यापीठ हेच साऱ्यांचे आश्रयस्थान व गुप्त केंद्र होते. राजगुरूंची भारताला खरी ओळख झाली ती साँडर्सच्या वधाच्या वेळी!

सुखदेव: सुखदेव हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांचे मूळ नाव सुखदेव रामलाल थापर होते. त्यांचा जन्म लुधियानातील चौरा बाजार येथे दि.१५ मे १९०७ रोजी झाला. या ठिकाणाला नऊ घर असेही संबोधतात. आईचे नाव शल्लीदेवी असे होते. त्यांनी पंजाबमध्ये क्रांतिकारकांची संघटना स्थापन केली. किंग जॉर्जच्या विरोधात गुप्त मसलतीच्या योजनेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांना धमकावले. यामुळे ब्रिटिश सरकारविरुद्ध सुखदेव अशी स्थिती निर्माण झाली. सुखदेवांनी ल्यालपूर- पंजाब येथे सन १९२६पासून तरुणांना एकत्र जमविण्यास सुरुवात केली. त्यांनी 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन'च्या वाङ्मयाचा तरुणांत प्रचार केला. दिल्ली येथे सन १९२८मध्ये सर्व क्रांतिनेत्यांची गुप्त परिषद भरली. तीत हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन नावाची नवीन देशव्यापी संघटना उभारण्याचे ठरले. केंद्रीय समितीत सुखदेव व भगतसिंग हे पंजाबतर्फे होते. यात शिव वर्मा, चंद्रशेखर आझाद आणि कुंदनलाल हे विद्यार्थीही होते. संघटनेच्या ठरलेल्या कार्यक्रमानुसार बाँबची कवचे बनविण्यासाठी सुखदेव लाहोरला गेले. नंतर तयार बाँबची चाचणी झांशी येथे घेतली. लाहोरच्या नॅशनल कॉलेजमधील अभ्यासिकेत सुखदेव यांनी हिंदुस्थानचा इतिहास, रशियन राज्यक्रांती या विषयांचा चिकित्सकपणे अभ्यास केला. जागतिक पातळीवरील क्रांतिकारक साहित्याचे विविध दृष्टिकोण त्यांनी अभ्यासले. कॉम्रेड रामचंद्र,भगतसिंग व भगवतीचरण व्होरा यांच्या मदतीने त्यांनी 'नौजवान भारत सभा' ही संघटना लाहोर येथे स्थापन केली. या संघटनेचे कार्यक्रम असे ठरविण्यात आले- १) स्वातंत्र्यलढ्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करणे. २) तर्कसंगत वैज्ञानिक दृष्टीचा अवलंब करणे. ३) जातियतेविरुद्ध लढणे. ४) अस्पृश्यतेची प्रथा बंद करणे. या कार्यक्रमांत त्यांनी सक्रिय भाग घेतला. सन १९२९ साली लाहोर खटल्याबद्दल तुरुंगात असताना त्यांनी कैद्यांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकीबद्दल उपोषण केले.

लाहोर खटल्याचा निकाल लावण्यात येऊन शिवराम राजगुरू यांच्यासह भगतसिंग व सुखदेव यांना अतिशय गुप्तता राखत फाशी देण्यात आली. दि.२३ मार्च १९३१च्या सायंकाळी राजगुरू, भगतसिंग व सुखदेव हसत हसत फाशीला सामोरे गेले. पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यात सतलज नदीच्या काठी हुसेनीवाला येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या तिघांच्या बलिदानाचा २३ मार्च हा दिवस भारतात राष्ट्रीय शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो. !! भारतीय शहीद दिनी सर्व नामानाम हुतात्म्यांना मानाचा लवून मुजरा !!

***********

**- संकलनकर्ता -**
**श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक.**
**भारतीय स्वातंत्र्यवीरांचा स्फूर्तिदायक इतिहास अभ्यासक.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली, व्हॉ.**
**नं. ९४२३७१४८८३.**

# जागतिक वन दिनानिमित्त बेंदी तांडा येथे कार्यक्रम संपन्न.



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) २१ मार्च रोजी जागतिक वनदिनानिमित्त संदीप चव्हाण (विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण नांदेड), श्रीकांत जाधव (सहाय्यक वनसंरक्षक), श्रीमती संध्या बगडे मॅडम (वनपरिक्षेत्र अधिकारी किनवट) यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षेत्र किनवट मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेंदी तांडा तालुका किनवट येथील शाळेमध्ये २१ मार्च रोजी जागतिक वनदिवस निमित्त शालेय विद्यार्थ्यांना वनांचे महत्त्व, पर्यावरणाचे महत्त्व, हवामानात होणारे बदल, शाळेतील विद्यार्थ्यांना बी गोळा करून *सीड्स बॉल तयार करण्यास उत्साह दिसून आला व शाळेमध्ये वृक्ष लागवड करून वनदिन साजरा करण्यात आला. त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कैलास पाटील सर (मुख्याध्यापक) तसेच सर्वश्री टी ए देवकते वनपाल, एस पी डोईफोडे वनपाल, बी एस भुरके वनरक्षक, नरवाडे सर, बाळासाहेब तिडके, बाबू मुंडकर, माधव मुंडकर सर, मिना नारपेडवार मॅडम, भुसमवाड सर, वेदाचार्य राठोड, अंकुश राठोड,तसेच गावातील नागरिक अर्जुन जाधव, विनोद राठोड, रमेश जाधव (सेवक), गणेश पवार यांची उपस्थिती होती.

# नवनियुक्त मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी सकाळी ९ पासून दिली कामाला पसंती, तर अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर सातही दिवस करणार काम.

मुंबई/ शहामत शेख :- मुंबई महापालिकेच्या आयुक्त पदाची सूत्रे हाती घेताच भूषण गगराणी आपल्या कामाकाजाची दिशा स्पष्ट केली . सकाळी नऊ वाजल्यापासूनच आपण मुख्यालयात हजर होऊन कामाची सुरवात करणार असे जाहीर केले. व असा संदेश आयुक्त कार्यालयातील कर्मचारी वृदाला देत आपणही नऊ वाजता सकाळी उपस्थित रहावे अशा सूचना दिल्या. गगराणी यांच्या पावलावर पाऊल ठेवतच अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी आठवड्याचे सातही दिवस आपण काम करणार असल्याचा निर्धार पक्का केला. त्यामुळे आमच्या सोबत तुम्हालाही उपस्थित राहावे लागेल अशा सूचना आपल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांना दिल्या. एवढेच नव्हे तर आपणास भेटायला येणारा प्रत्येक व्यक्ती व अधिकारी वर्ग यावर आपला लक्ष राहावा याकरिता आपल्या कार्यालयीन व इतर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे निर्देश प्रशासनाला दिल्याची माहिती मिळत आहे. मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांच्यासह अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर आणि अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांनी महापालिका आयुक्तालयात जाऊन




पदाचा भार बुधवारी स्वीकारला. त्यानंतर गगराणी पहिल्याच दिवसापासून आपण सकाळी नऊ वाजल्यापासून कार्यालयात उपस्थित राहणार असून,मला त्याच वेळेत कर्मचारी वर्ग उपस्थित हवा आहे,कोणी कसे उपस्थित राहायचे याचे नियोजन आपण करावे असे निर्देश यांनी दिले. पदभार स्वीकारल्यानंतर महापालिका आयुक्त गगराणी पहिल्या दिवशी नऊ वाजता सकाळी पोहोचले. मात्र दुसरीकडे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर आपल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यावर लक्ष राहावे याकरिता सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे निर्देश दिले. महापालिका आयुक्त भूषण गगराणी या पाठोपात अतिरिक्त आयुक्त बांगर यांनी कर्मचाऱ्यांच्या शिस्तीचे दृष्टिकोनातून उचललेल्या पावलाची मुंबई महापालिकेत चर्चेचा विषय ठरला आहे.

# भरारी पथके, चेक पोस्टच्या माध्यमातून आदर्श आचारसंहितेची कठोर अंमलबजावणी करा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे



लातूर, दि. २२ : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता जिल्ह्यात लागू असून या आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासाठी भरारी पथके, चेक पोस्ट स्थापन करण्यात आले आहेत. याकरिता नियुक्त सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहून काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे केल्या.आदर्श आचारसंहिता कक्ष आणि सी व्हिजील प, मतदान केंद्रांवरील कायदा व सुव्यवस्था यासह निवडणूक आयोगामार्फत कार्यान्वित विविध पच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. आदर्श आचारसंहिता कक्षाचे प्रमुख तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, संगीता टकले यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते.भरारी पथकांनी आपल्या कार्यक्षेत्रात कोणत्या ठिकाणी आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्यास किंवा कोणताही गैरप्रकार होत असल्यास त्याची तातडीने दखल घेवून भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. तसेच चेक पोस्टवर तैनात करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वाहनांची तपासणी करून रोकड, मद्य यासह इतर प्रतिबंधित बाबींची वाहतूक होणार नाही, याची काळजी घ्यावी. या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा करू नये, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. राजकीय पक्ष, उमेदवारांना सभा, प्रचारासाठी विविध परवानग्या घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे, परवानगीची पद्धत याबाबत सर्व राजकीय पक्ष प्रतिनिधींना माहिती देण्यात यावी. तसेच निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या विविध पच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक उपविभागीय अधिकारी यांनी आपले स्तरावर स्वतंत्र नोडल अधिकारी नेमण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. तसेच सी-व्हिजील पवर प्राप्त होणाऱ्या आदर्श आचारसंहिता भंगाच्या तक्रारीवर १०० मिनिटात कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास संबंधित भरारी पथक, चेकपोस्ट वरील अधिकाऱ्यांनी संबंधितांवर गुन्हा दाखल करून त्याबाबतचा अहवाल आपल्या नोडल अधिकाऱ्यांना द्यावा, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी सांगितले.

# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त जळकोट तालुका काँग्रेसच्या वतीने बालाजी मंदिरात अभिषेक व आरती

लातूर प्रतिनिधी: राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार दि.२१ मार्च २०२४ रोजी जळकोट तालुका काँग्रेस व शहर काँग्रेसच्या वतीने तालुक्यात व शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.बालाजी मंदिर येथे अभिषेक व आरती करण्यात आली.तसेच हाकानी बाबा दर्गा येथे चादर अर्पण करण्यात आली. त्यानंतर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले . याप्रसंगी नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मन्मंथआप्पा किडे,जळकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष तथा संचालक मारुती पांडे, शहराध्यक्ष महेश दादा धूळशेट्टे, तालुका उपाध्यक्ष दत्ता पवार, सरपंच अध्यक्ष मेहताब बेग,शिरीष पाटील, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष नूरभाई पठाण, अनु जाती तालूका अध्यक्ष संग्राम कांबळे, युवक तालुका अध्यक्ष धनराज दळवे, तालुका उपाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, नगरसेवक संग्राम नामवाड, डॉ. सचिन सिद्धेश्वरे,ओमकार धूळशेट्टे, संचालक राजेश मोतेवाड, सचिन देशमुख, नागोराव देशमुख, संभाजी कोसंबे, हावगी महाराज स्वामी, प्रमोद दाडगे, प्रा.राजेंद्र वाघमारे, बालाजी बनसोडे, एकनाथ घोणशेट्टे, विजय मुक्कनवार, विजय कामशेट्टे, परमेश्वर धूळशेट्टे, बाबळसरे संगमेश्वर,संतोष डुमणे, तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मॅनेजर गोताळे, मनोहर केंद्रे, बालाजी वंजवाड,मुसळे, कॅशियर एच एन शेख, आदींसह जळकोट तालुका काँग्रेस व शहर काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# लातूर शासकीय महिला तंत्रनिकेतन येथील स्ट्रॉंग रूमची जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी केली पाहणी



लातूर, दि. २२ : लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदानानंतर मतदान यंत्रे (ईव्हीएम) मशीन लातूर येथील शासकीय महिला तंत्रनिकेतन येथील स्ट्रॉंग रूममध्ये ठेवण्यात येणार आहेत. या स्ट्रॉंग रूमची आज जिल्हधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी संयुक्त पाहणी केली. तसेच येथील मतमोजणी कक्षातील व्यवस्थेचा आढावा घेतला.प्रभारी अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, पोलीस उपाधीक्षक जी. एल. भातलवंडे यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. लातूर लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्व मतदान यंत्रे शासकीय महिला तंत्रनिकेतन येथील स्ट्रॉंग रूममध्ये ठेवण्यात येणार असल्याने त्याबाबतची पूर्वतयारी सुरु आहे. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक श्री. मुंडे यांनी स्ट्रॉंग रूमची, मतदान कक्ष आणि परिसराची संयुक्त पाहणी केली. यावेळी त्यांनी स्ट्रॉंग रूममधील व्यवस्था, मतमोजणी कक्षातील बैठक व्यवस्था, पार्किंग व्यवस्था आदी बाबींचा आढावा घेतला. तसेच या अनुषंगाने संबंधितांना सूचना दिल्या.

# शिवसेना व्ही. जे. एन. टी. चे प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब किसवे लातूर दौऱ्यावर



लातूर : शिवसेना भटक्या विमुक्त जाती जमाती व्हिजेएनटीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब किसवे आज शनिवार दिनांक २३ मार्च रोजी लातूर दोऱ्यावर येत आहेत. यावेळी आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडनुक आणि व्ही. जे. एन. टी. च्या संघटनात्मक बांधणी, राज्य सरकार आणि संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासात्मक निर्णय आणि धोरण याबाबत चर्चा करण्यात येईल. या बैठकीच्या अध्यक्ष स्थानी शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख ॲड . बळवंतभाऊ जाधव यांची उपस्थिती राहील. सदरील बैठक ही शिवसेना उपजिल्हा प्रमुख सतीश देशमुख यांचे संपर्क कार्यालय, नाईक चौक, रींग रोड, लातूर येथे सकाळी ११. ०० संपन्न होत आहे. तर दुपारी ४.०० वाजता अहमदपूर, चाकूर आणि उदगीर यांची बैठक उदगीर येथे शिवशेना कार्यालय येथे संपन्न होईल.तरी या बैठकीस जिल्हातील सर्व उपजिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख, शहर प्रमुख, युवा सेना प्रमुख, महिला प्रमुख आणि शिवसैनिक यांनी उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हा प्रमुख शिवाजी माने, गोपाल माने यांनी केले.

# माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकरांकडून रेणापूर येथील राठोड परिवाराचे सांत्वन



लातूर दि.२२/०३/२०२४ रेणापूर शहरातील रुपचंद नगर परिसरातील रहिवासी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा मागासवर्गीय सेवा संघाचे अध्यक्ष कै.मिठाराम रूपचंद राठोड (वय ७४ वर्ष) यांचे नुकतेच १७ मार्च २०२४ रोजी रविवारी पहाटे निधन झाले. या घटनेची माहिती मिळताच भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी त्यांच्या रुपचंद नगर येथील निवासस्थानी भेट देऊन राठोड परिवाराचे सांत्वन केले.यावेळी राठोड परिवारातील त्यांच्या पत्नी उषाताई मिठाराम राठोड, मुले प्रदीप राठोड मनोज राठोड, संदीप राठोड, मुली शोभा पवार, शिवनंदा चव्हाण, चुलते रावसाहेब राठोड यांच्यासह परिवारातील सदस्य उपस्थित होते.यावेळी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या समवेत भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अशोकराव पाटील, पंचायत समितीचे माजी गटनेते आप्पासाहेब पाटील, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रतापराव शिंदे, दिलीप पाटील,लालासाहेब चव्हाण, अशोक राजे, विजय एकुर्गे, प्राचार्य डॉ.आर.एस.अवस्थी, उपप्राचार्य प्रा.डॉ.प्रकाश शिंदे, उपप्राचार्य डॉ. गणेश नागरगोजे, प्रा.सिध्दार्थ चव्हाण आदी उपस्थित होते.

# लातूर येथे बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण उत्साहात संपन्न

लातूर :- समग्रशिक्षा अंतर्गत विशेष प्रशिक्षण उपक्रमातील बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण सरस्वती विद्यालय,बार्शीरोड, लातूर येथील सभागृहात उत्साहात संपन्न झाले.प्रशिक्षण उद्घाटनसत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी चंद्रहांस म्हेत्रे तर उद्घाटक म्हणून लातूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी निवृत्ती जाधव व प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक हणमंत गवळी,नोडल मुख्याध्यापक सूर्यवंशी एस.एस.यांची उपस्थिती होती.सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यस्तरीय बालरक्षक नजीऊल्ला शेख यांनी केले.तर उपस्थित प्रमुख मान्यवरांनी सर्व बालरक्षकांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.एक गाव एक बालरक्षक या समता विभाच्या नियोजनानुसार लातूर तालुक्यातील प्रत्येक गावातील बालरक्षकांची या प्रशिक्षण सत्रास उपस्थिती होती.उपस्थित बालरक्षकांना विश्र्वास नामाची यावेळी शपथ देण्यात आली.या प्रशिक्षण सत्रामध्ये - बालरक्षक चळवळ संकल्पना, वैशिष्ट्ये व भूमिका,समता विभाग कामकाज,बालकांचे हक्क सुरक्षितता आणि बालरक्षकांची भूमिका, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० निपून भारत मिशन, वयानुरूप प्रवेश व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी, आदर्श प्रमाणित संचालन प्रक्रिया एस ओ पी शाळा बाह्य मूलांचे सर्वेक्षण संदर्भात चर्चा व मार्गदर्शन,बालरक्षकांच्या उत्कृष्ट कामाचे सादरीकरण,बालरक्षक जिल्हा-तालुका समन्वयक समता विभाच्या कामकाज विषयक माहिती विश्लेषण व ग्रामस्तरावर कार्य करणाऱ्या बालरक्षकांचे अनुभव कथन, आणि शेवटी प्रश्नोत्तरे घेऊन शंका समाधान करण्यात आले.प्रशिक्षण सत्रादरम्यान लातूर डायटच्या प्राचार्या डॉ.भागिरथी गिरी, जेष्ठ अधिव्याख्याता डॉ.सलगर साहेब, समता विभाग प्रमुख संतोष ठाकूर यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थी बालरक्षकांशी सुसंवाद साधला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण सत्राचे सुलभा म्हणून नजीऊल्ला शेख, अनिल तापडिया, बालाजी सपाटे व लातूर तालुका समन्वयक समता विभाग श्रीमती सोमवंशी जे.जे.यांनी उत्कृष्ठ रित्या काम पाहिले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE